Indian Academy of Pediatrics (IAP)
**महाराष्ट्र राज्य बालरोग तज्ज्ञ संघटना (MAHAIAP)**

## प्रकरण ९९ :

# मला मूल दत्तक घ्यायचे आहे

मुले दत्तक घेण्याची परंपरा आपल्या देशात वर्षांवर्षे चालू आहेत गेल्या काही वर्षात ही दत्तक घेण्याची प्रक्रिया एका विशिष्ट कायदेशीर पद्धतीने केल्यामुळे भविष्यामध्ये अनेक अडचणी टाळल्या जातात आम्हाला मूल दत्तक घ्यायचे असल्यास काय करावे याबाबत पालकांना हे मार्गदर्शन उपयोगी पडेल


अध्यक्ष २०२३ : डॉ. रमाकांत पाटील
सचिव २०२२-२३ : डॉ. अमोल पवार
अध्यक्ष २०२२ : डॉ. हेमंत गन्गोलीया
मार्गदर्शक : डॉ. जयंत उपाध्ये
समन्वयक : डॉ. नरेंद्र नानिवडेकर
अनुवादक : डॉ. चंद्रशेखर दाभाडकर
पुनरावलोकन : डॉ. नरेंद्र नानिवडेकर, सौ. लीना पागे

*Convener:* **(Lt Col) Achinta KR Mallick**
*Members:* **Arun Jain, Neelesh Banker, Swapan Kumar Ray**
*Reviewer:* **Peeyush Khanna**




### मला मूल दत्तक घ्यावयाचे आहे याबाबत वारंवार विचारले जाणारे दहा प्रश्न

१ भारतात कुठल्या दत्तक प्रक्रिया कायदेशीर आहेत?
२ एखादे मूल दत्तक घेण्याकरता काही मूलभूत निकष आहेत का?
३ नवजात बालकास दत्तक घेता येते का? जर तसे नसेल तर दत्तक घेण्याकरता बाळाचे कमीत कमी वय किती असले पाहिजे?
४ भारतामध्ये एखादे बाळ दत्तक घेण्याची काय प्रक्रिया आहे?
५ भारतात दत्तक घेताना कुठल्या गोष्टींना परवानगी आहे व कुठल्या गोष्टींना परवानगी नाही?
६ दत्तक प्रक्रिया सुलभ करण्यासाठी दत्तक एजन्सी पैशाची मागणी करू शकते का?
७ CARA द्वारे नोंदणी केल्यानंतर मुलाला दत्तक घेण्यासाठी किती कालावधी लागतो?
८ दत्तक प्रक्रियेत केंद्रीय दत्तक संसाधन प्राधिकरण (Central adoption resource authority : CARA) या संस्थेची काय भूमिका आहे? मी CARINGS वेबसाईटवर कशी नोंदणी करावी व तेथे मी काय कागदपत्रे अपलोड करावीत?
९ दत्तक घेण्याकरिता CARA या संस्थेशी संपर्क करणे का आवश्यक आहे? संभाव्य दत्तक पालकांना विशेष दत्तक एजन्सीकडून बालक थेट दत्तक घेता येते का?
१० दत्तक मुलास/मुलीस 'आम्ही तुला दत्तक घेतले आहे' हे पालकांनी सांगावयास पाहिजे का?


**Under the Auspices of the IAP Action Plan 2021–2022**

**Piyush Gupta** IAP President 2021
**Remesh Kumar R** IAP President-Elect 2021
**Bakul Parekh** IAP President 2020
**GV Basavaraja** IAP HSG 2020–2021
**Deepak Ugra** National Co-ordinator


Ch-099.indd 1 12-11-2021 10:40:28

© Indian Academy of Pediatrics

## IAP Parent Guideline Committee

**Chairpersons:** Piyush Gupta, Bakul Parekh
**IAP Co-ordinators:** GV Basavaraja, Harish Kumar Pemde, Purna Kurkure

### Core Group

*National Co-ordinator:* ***Deepak Ugra***
*Member Secretaries:* ***Upendra Kinjawadekar, Samir Dalwai***
*Members:* ***Apurba Ghosh, CP Bansal, Santosh Soans, Somashekhar Nimbalkar, S Sitaraman***

# ११

# मला मूल दत्तक घ्यायचे आहे

प्रश्न (१)

## भारतात कुठल्या दत्तक प्रक्रिया कायदेशीर आहेत?

बाल न्याय कायदा (काळजी व संरक्षण) २०१५ नियमन २०१७ (Juvenile justice, care and protection, Adoption regulations 2017) या कायद्याप्रमाणे खालील पाच प्रकारच्या दत्तक प्रक्रिया कायदेशीर आहेत –

१. नात्यात नसलेल्या पण भारतातच राहत असलेल्या एखाद्या व्यक्तीने एखादे टाकून दिलेले, समर्पित केलेले, किंवा निराधार असलेले मूल दत्तक घेणे
२. नात्यात असलेल्या पण भारतातच राहत असलेल्या एखाद्या व्यक्तीने एखादे टाकून दिलेले, समर्पित केलेले किंवा निराधार असलेले मूल दत्तक घेणे
३. भारतातच राहत असलेल्या व्यक्तीने नात्यात असलेले एखादे मूल दत्तक घेणे
४. भारताबाहेर राहत असलेल्या व्यक्तीने नात्यात असलेले एखादे मूल दत्तक घेणे
५. सावत्र पालकांनी देशातच मूल दत्तक घेणे

'जर एखादे मूल खालील प्रकारात येत असेल तर दत्तक घेता येते...

- अनाथ, टाकून दिलेले किंवा समर्पित केलेले आणि बाल कल्याण समितीने (child welfare committee) दत्तक घेण्याकरिता कायदेशीररित्या जाहीर केलेले मूल
- नातेवाईकांचे मूल (नातेवाईक म्हणजे काका–काकी, मामा–मामी किंवा दोन्ही बाजूचे आजी आजोबा)
- आपल्या जोडीदाराचे/ची आधीच्या लग्नापासून झालेले आणि जैविक पालकांनी समर्पित केलेले/केलेली (सावत्र पालकांनी दत्तक घेण्यास तयारी दर्शवलेली असेल तर) मूल किंवा मुले (अधिनियम ३८ आणि ५६ JJ (C&PC) कायदा २०१५ आणि नियमन ४ दत्तक नियमनानुसार

प्रश्न
(२)

## एखादे मूल दत्तक घेण्याकरता काही मूलभूत निकष आहेत का?

- संभाव्य दत्तक पालक (PAP) : जे पालक शारीरिक, मानसिक व भावनिकरित्या स्थिर असतील तसेच आर्थिकदृष्ट्या सक्षम असून त्यांना कुठलाही जीवघेणा आजार नसेल असे पालकच (संभाव्य दत्तक पालक) बाळ दत्तक घेऊ शकतात.
- लग्न झालेल्या जोडप्यांचा दोन वर्ष सुदृढ व स्थिर विवाहित संबंध असावयास पाहिजे. दोघांचीही दत्तक घेण्यास सहमती हवी व त्या दोन्ही पालकांच्या वयाची बेरीज ११० वर्षांपेक्षा जास्त असू नये
- एकल पालक (एकच पालक) ज्यांना आधीचे नैसर्गिक अथवा दत्तक मूल असेल असे पालकदेखील खालील अटींची पूर्तता करून दत्तक घेऊ शकतो–
- एखादी पालक स्त्री कुठल्याही लिंगाचे मूल दत्तक घेऊ शकते.
  - एकल पुरुष पालक मुलीस दत्तक घेऊ शकत नाही
  - एकल पालकाचे वय ५५ वर्षांपेक्षा जास्त असू नये.
  - त्याला/तिला आधीच्या वैयक्तिक वैवाहिक संबंधातून चार पेक्षा जास्त अपत्ये असू नयेत. अपवाद – जर ते अपत्य विशेष गरजा असणारे मूल (child with special need) असेल, काही कारणामुळे दत्तक देण्यास अडचणी असणारे मूल, नातेवाईकांचे मूल अथवा सावत्र मूल असेल त्या बालकास दत्तक घेता येते.)

दत्तक जाणाऱ्या बाळाचे वय व संभाव्य दत्तक पालकांचे वय (पंजीकरणाच्या दिवशी) याबद्दलही काही बंधने आहेत. ती खालील तक्त्यात दाखविली आहेत

| बाळाचे वय | संभाव्य दत्तक पालकाचे एकूण वय (वर्षे) | एकल पालकाचे जास्तीत जास्त वय (वर्षे) |
|---|---|---|
| ० ते १८ वर्षे | ९० वर्षे | ४५ वर्षे |
| ४ ते ८ वर्षे | १०० वर्षे | ५० वर्षे |
| ८ ते १८ वर्षे | ११० वर्षे | ५५ वर्षे |

प्रश्न
(३)

## नवजात बालकास दत्तक घेता येते का? जर तसे नसेल तर दत्तक घेण्याकरता बाळाचे कमीत कमी वय किती असले पाहिजे?

निराधार झालेले, टाकून दिलेले किंवा समर्पित केलेले नवजात बालक कायद्याप्रमाणे दत्तक घेता येत नाही. जर असे एखादे नवजात बाळ, ज्याला काळजी आणि संरक्षणाची गरज आहे, कुणाला आढळल्यास त्यांनी चाईल्ड लाईन फोन नंबर १०९८ किंवा स्थानिक पोलीस, दत्तक घेणारी एखादी संस्था, बालकल्याण समिती किंवा जिल्हा बाल संरक्षण विभाग यांना कळविणे आवश्यक आहे. असे आढळलेले मूल पोलिसांच्या ताब्यात असते व पोलीस विभाग त्यांच्या नैसर्गिक पालकांना शोधण्याचा प्रयत्न करतात. जर पालक सापडले नाहीत तर अशा बालकांना दत्तक देणाऱ्या एखाद्या संस्थेत किंवा बाळाची काळजी घेणाऱ्या एखाद्या केंद्रात ठेवतात. या बाळावर कुणीच अधिकार सांगितला नाही तर ते बाळ कायदेशीररित्या दत्तक देण्यास पात्र ठरते. या सर्व प्रक्रियेस किमान दोन ते तीन महिन्याचा कालावधी लागतो. पालकांना त्यांचे मूल दत्तक द्यावयाचे असल्यास त्यांना दत्तक संगोपन केंद्रात ठेवता येते. पण नैसर्गिक पालकांना अंतिम निर्णय घेण्याकरता ९० दिवसांचा कालावधी देतात. या कालावधीनंतरच दत्तक देण्याची कायदेशीर प्रक्रिया सुरू होते.





Ch-099.indd 4 12-11-2021 10:40:29

प्रश्न (४)

## भारतामध्ये एखादे बाळ दत्तक घेण्याची काय प्रक्रिया आहे?

भारत सरकारच्या महिला व बालविकास मंत्रालयाच्या केंद्रीय दत्तक संसाधन प्राधिकरण (CARA) या संस्थेकडे भावी दत्तक पालकांना (PAPs) नोंदणी करणे आवश्यक असते. ही संस्था (CARA) प्रामुख्याने अनाथ, परित्यक्त आणि समर्पित केलेल्या मुलांना दत्तक घेण्याची संबंधित मान्यता प्राप्त एजन्सीद्वारे व्यवहार करते. त्यांच्या संकेत स्थळावर आवश्यक ती सर्व कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक असते. ही नोंदणी झाल्यानंतर इच्छुक पालकांना पुढील पत्रव्यवहारासाठी एक विशिष्ट क्रमांक (ID) दिला जातो.

या संकेत स्थळावर त्यांना त्यांचा ज्येष्ठता क्रम पाहता येतो. खालील आकृतीत या सर्व प्रक्रियेचे वर्णन केले आहे

### देशांतर्गत दत्तक पद्धतीच्या प्रक्रिया:

**सुरुवात**

- इच्छुक पालकांनी (संभाव्य दत्तक पालकांनी) त्यांची सर्व कागदपत्रे उठ या वेबसाईटवर अपलोड करावीत
- तुमच्या घराचा अभ्यास करून संबंधित समाजसेवक तो अहवाल CARINGS वर अपलोड करतील.

**दत्तक प्रक्रिया**

- संभाव्य दत्तक पालकांना त्यांच्या निवडीनुसार व पात्रतेनुसार कायद्याप्रमाणे दत्तक घेण्यास पात्र असणाऱ्या मुलांची माहिती कळविण्यात येते.
- संभाव्य दत्तक पालक (PAP) आपले बालक ४८ तासात आरक्षित करतील.
- संभाव्य दत्तक पालक व बालक एकमेकांना अनुरूप आहेत का नाही हे दत्तक समिती वीस दिवसात ठरवतील.
- संभाव्य दत्तक पालक बालक स्वीकारतील व बाळास दत्तक पूर्व काळजी केंद्रात पाठवतील.
- SAA ने स्वीकृतीच्या दहा दिवसाच्या आत नियुक्त केलेल्या न्यायालयात याचिकाकर्ता म्हणून सहयाचिका दाखल करतील.
- नेमणूक केलेल्या कोर्ट इन कॅमेरा सुनावणीनंतर ६० दिवसाच्या आत कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करते.

**दत्तक घेण्यासंबंधी पाठपुरावा**

- आठ दिवसाच्या आत जन्म दाखल्याचा अर्ज घेणे व जन्म दाखला देणे
- दत्तक घेतल्यानंतर दोन वर्षापर्यंत त्या दत्तक घेतलेल्या कुटुंबाचा पाठपुरावा करणे

प्रश्न
(५)

## भारतात दत्तक घेताना कुठल्या तरतुदींना परवानगी आहे व कुठल्या तरतुदींना परवानगी नाही?

- नवजात मुलाला दत्तक घेता येत नाही.
- रस्त्याच्या कडेला / मंदिरात किंवा इतर कोणत्याही ठिकाणी सापडलेले मूल दत्तक घेता येत नाही.
- एखाद्या व्यक्तीला एखादे बालक थेट रुग्णालयातून दत्तक घेता येत नाही.
- तुमच्या इच्छेप्रमाणे एखाद्या विशिष्ट जातीचे किंवा विशिष्ठ धर्माचे मूल दत्तक घेऊ शकत नाही.
- रंग आणि वैशिष्ट्ये या अटी घालून मूल निवडू शकत नाही.
- लिव्ह–इन रिलेशनशिपमध्ये असलेले जोडपे मूल दत्तक घेऊ शकत नाहीत.
- संभाव्य दत्तक पालकांना (PAPs) ५ वर्षांपेक्षा जास्त वयाचे मूल असल्यास, मूल दत्तक घेण्यासाठी त्याची/तिची परवानगी आवश्यक आहे.
- संभाव्य दत्तक पालकांना (PAPs) मुलाचे वय, लिंग आणि आरोग्य स्थितीची निवड करता येते. (पालकांना अपंग मूल दत्तक घ्यावयाचे असल्यास ते तशी इच्छा व्यक्त करू शकतात).
- तुमच्या इच्छेप्रमाणे दत्तक बाळाकरिता तुम्ही कांही अटी घातल्या असतील तर अशा प्रकरणांमध्ये, तुमच्या आवडीचे मूल मिळण्याकरिता अधिक वेळ लागू शकतो. कारण अशा मुलांची उपलब्धता कमी असू शकते.
- मूल दत्तक घेण्यासाठी संभाव्य दत्तक पालकांसाठी किमान उत्पन्नाची पात्रता निकष म्हणून अट नाही. परंतु सामाजिक कार्यकर्त्याने घरास भेट दिली असताना मुलाला चांगले/वाजवी जीवनमान देण्यासाठी संभाव्य दत्तक कुटुंबाची क्षमता आणि इच्छा बघितली जाते.
- अपंग जोडपीदेखील दत्तक घेण्यास पात्र आहेत. अपंगत्वाच्या स्वरूपावर आणि व्याप्तीवर अवलंबून सामाजिक कार्यकर्ता गृहअभ्यास अहवाल तयार करताना, संभाव्य दत्तक कुटुंबाला मुलाचे पालनपोषण करण्यासाठी योग्य परिस्थिती आहे की नाही याचे मूल्यांकन केले जाते.
- संभाव्य दत्तक पालक बालकाचे काका, काकी, मामा, मामी अथवा आजी आजोबा असल्यास अशा मुलांना नात्यातच दत्तक देता येते.
- जर एखादे दत्तक मूल नात्यातले नसेल (म्हणजेच सोडून दिलेले, समर्पित केलेले किंवा अनाथ मूल असेल) तर दत्तक प्रक्रिया फक्त CARA द्वारेच पार पाडावी लागेल. असे केले नाही तर बाल न्याय कायदा २०१५ प्रमाणे (C&PC act) कलम ३२, ३३, ३४ नुसार ६ महिने तुरुंगवास किंवा १०,००० रुपये दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.
- एकदा दत्तक घेण्याचा आदेश मंजूर झाल्यानंतर, जैविक पालकांचे मुलाशी कोणतेही कायदेशीर संबंध रहात नाहीत.
- जैविक पालक आणि दत्तक पालक दोघांचेही तपशील गोपनीय ठेवले जातात जेणेकरून पालकांपैकी कोणीही एकमेकांना ओळखू नये.
- तथापि, जर दत्तक मुलाला नंतर त्याच्या जैविक पालकांना जाणून घ्यायचे असेल आणि त्यांना भेटायचे असेल, तर दत्तक एजन्सी पालकांच्या दोन्ही बाजूंच्या परवानगीने ती माहिती दत्तक बालकास देऊ शकते.
- संभाव्य दत्तक पालकांनी दत्तक घेताना काही मालमत्ता किंवा पैसे दत्तक मुलाला हस्तांतरित करणे आवश्यक नाही. कारण वारसा कायदा जैविक आणि दत्तक घेतलेल्या मुलासाठी समानपणे लागू आहे. पालकांच्या आर्थिक स्थितीनुसार न्यायालय मुलाच्या नावावर काही गुंतवणूक आणि मुदत ठेवींसाठी विनंती करू शकते, परंतु ते अनिवार्य नाही.

प्रश्न (६)

## दत्तक प्रक्रिया सुलभ करण्यासाठी दत्तक एजन्सी पैशाची मागणी करू शकते का?

CARA द्वारे मूल दत्तक घेताना पैशाचा कोणताही व्यवहार करणे बेकायदेशीर आहे. दत्तक विनियम २०१७ मध्ये नमूद केल्याप्रमाणे याला कांही अपवाद आहेत. SAA खालील शुल्क आकारते आणि पैशाची पावती देते.

- गृह अभ्यास अहवालासाठी फी, रु. ६०००/-.
- बाळ संगोपन संग्रह फी रु. ४०,००० /-
- दत्तक घेतल्यानंतर दत्तक बाळाचा पाठपुरावा करण्यासाठी (follow up) प्रत्येक भेटीसाठी रु. २०००/- आकारले जाते व ही भेट दर सहा महिन्याने २ वर्ष (एकूण चार भेटी) केली जाते.

प्रश्न (७)

## उठ द्वारे नोंदणी केल्यानंतर मुलाला दत्तक घेण्यासाठी किती कालावधी लागतो?

संभाव्य दत्तक दिल्या जाणाऱ्या मुलांची यादी (डेटाबेस) आणि पालकांची नोंदणी केंद्रीकृत पद्धतीने CARINGS या सॉफ्टवेअरद्वारे केली जाते व याचे व्यवस्थापन CARA ही संस्था करते. केंद्रीय संस्थेने ही देखरेख व व्यवस्थापन केल्यामुळे मुलांच्या सर्वोत्तम हितासाठी पारदर्शकता ठेवता येते, उत्तरदायित्व राखता येते, उपलब्ध असणाऱ्या मुलांची यादी व्यवस्थित ठेवता येते, प्रक्रियेत जलदता आणता येते, या प्रक्रियेत सामील असणाऱ्या सर्व व्यक्तींचा समन्वय चांगल्या पद्धतीने साधता येतो, मुलांचे पुनर्वसन व्यवस्थित करता येते. संभाव्य दत्तक पालकांची संख्या जास्त व उपलब्ध बालकांची संख्या कमी असल्यामुळे प्रतीक्षा कालावधी जास्त असतो. यात बालकाचे विशिष्ट वय व लिंग याची मागणी असेल तर हा प्रतीक्षा कालावधी आणखीनही लांबतो. दोन वर्षाच्या खालील मुलांकरता प्रतीक्षा कालावधी जास्त असतो असे आढळून आले आहे दत्तक घेताना बालकांमध्ये कुठल्या गोष्टीकरता प्राधान्य दिले जाते यावरही हा प्रतीक्षा कालावधी अवलंबून असतो. (उदा: महाराष्ट्रात दत्तक बालकांची यादी जास्त व संभाव्य पालकांची यादी कमी असल्यामुळे प्रतीक्षा यादी कमी असते तर या उलट आसामसारख्या राज्यात संभाव्य दत्तक बालकांची संख्या कमी व पालकांची यादी मोठी असल्यामुळे प्रतीक्षा यादी मोठी असते). त्यामुळे संभाव्य दत्तक पालकांनी आपले बालकांच्या निवडीचे निकष कळविण्याआधी उपलब्ध असणाऱ्या बालकांचे वय, लिंग व त्यांचे राज्य हे आधी संकेत स्थळावर पहावे. जर संभाव्य दत्तक पालकांनी बाळ लगेच सुनिश्चित केले अथवा विशेष गरजा असणाऱ्या बालकांना प्राधान्य दिले तर ही प्रतीक्षा यादी त्यांच्याकरता आणखी कमी होईल. थोडक्यात हा प्रतीक्षा कालावधी सरासरी सहा महिने ते दोन वर्ष असा असतो.

## प्रश्न (८)

### दत्तक प्रक्रियेत केंद्रीय दत्तक संसाधन प्राधिकरण (Central adoption resource authority : CARA) या संस्थेची काय भूमिका आहे? मी CARINGS वेबसाईटवर कशी नोंदणी करावी व तेथे मी काय कागदपत्रे अपलोड करावीत?

- केंद्रीय दत्तक संसाधन प्राधिकरण (CARA) ही संस्था देशांतर्गत व आंतर्देशीय दत्तक प्रक्रियेस प्रोत्साहन देण्याकरता व ही प्रक्रिया सुलभ करण्याकरीता भारत शासनाची संस्था आहे.
- CARINGS या संस्थेत नोंदणी करण्याकरीता संभाव्य दत्तक पालकांनी
- http://carings.nic.in/Parents/Instructions For-Online-Parent-Registration-fordoption.html या वेबसाईटवर नोंदणीचा फॉर्म भरावा आणि आवश्यक कागदपत्रे अपलोड करावीत. याकरता कुठली कागदपत्रे लागतात ती दत्तक घेण्याच्या कायद्यातील अनुसूची ६ मध्ये दिली आहे तसेच ही यादी
- http://carings.nic.in/Parents/Instructions For-Online-Parent-Registration-fordoption.html
- येथेही उपलब्ध आहे. ही कागदपत्रे ३० दिवसाच्या आत अपलोड करावीत. काही शंका असल्यास wcdnic.in येथे ई–मेल करा किंवा या १८००–११–१३११ टोल फ्री क्रमांकावर फोन करा किंवा या ०११–२६१८०१९४/०११–२६७६०४७४ क्रमांकावर संपर्क साधा.

## प्रश्न (९)

### दत्तक घेण्याकरिता CARA या संस्थेशी संपर्क करणे का आवश्यक आहे? संभाव्य दत्तक पालकांना विशेष दत्तक एजन्सीकडून बालक थेट दत्तक घेता येईल का?

दत्तक घेण्याची प्रक्रिया ही CARA या संस्थेमार्फतच करणे आवश्यक आहे. एखाद्या नोंदणी नसलेल्या दत्तक एजन्सीकडून दत्तक घेणे बेकायदेशीर आहे. तसेच सर्व दत्तक एजन्सीजने व बालकल्याण केंद्राने CARA या संस्थेकडे नोंदणी करणे आवश्यक आहे असे शासनाने निर्देश दिले आहेत. याद्वारे दत्तक घेता येणाऱ्या सर्व उपलब्ध बालकांची अद्ययावत एकत्रित यादीची नोंदणी येथे आहे. असे केल्याने या सर्व प्रक्रियेत पारदर्शकता येते व यामुळे संभाव्य दत्तक पालकास दत्तक दिल्याचा आदेश दिला गेला आहे याची खात्री मिळते आणि दत्तक बालकांचे जैविक पालक बालकांवर आपला हक्क सांगू शकत नाही. यामुळे मुलांची तस्करी करण्याचे थांबेल व बेकायदेशीर दत्तक देण्यामधला पैशांचा व्यवहार थांबेल. दत्तक देण्यापूर्वी CARA ही संस्था बालरोगतज्ज्ञांकडून बालकांची सविस्तर वैद्यकीय तपासणी करून बाळाची शारीरिक प्रकृती सुस्थितीत आहे व दत्तक देण्यास योग्य आहे याची खात्री करून घेते. बाळास 'विशेष वैद्यकीय मदतीची गरज' या श्रेणीत ठेवण्यापूर्वी त्याला वैद्यकीय उपचार दिले जातात. यामुळे पालकांना सुरुवातीपासूनच बालकांच्या आरोग्याची कल्पना येते व भविष्यात होणारे वाद टाळता येऊ शकतात.



Ch-099.indd 8 12-11-2021 10:40:29

प्रश्न
(१०)

## दत्तक मुलास / मुलीस 'आम्ही तुला दत्तक घेतले आहे' हे पालकांनी सांगावयास पाहिजे का?

दत्तक प्रक्रिया ही पूर्णपणे पारदर्शक असते आणि त्यात दोघांचे (बालक व पालक) संबंध हे एकमेकांच्या विश्वासावर अवलंबून असतात. त्यामुळे 'दत्तक' हा शब्द पालकांनी मुलांचा शब्दसंग्रह वाढत असतानाच (बाळास समज येत असतानाच) लवकरात लवकर समजावून सांगावा. इतरांकडून त्याला ही गोष्ट समजण्याऐवजी पालकांनीच लवकरात लवकर त्यालाही कल्पना द्यावी. अन्यथा त्याचा पालकांवरचा विश्वास कमी होईल. त्या बाळास योग्य त्या वातावरणात केव्हा व कशी या गोष्टीची कल्पना द्यावी हे पालकांनीच ठरवावे. ही गोष्ट बाळास कोण सांगते व कशा प्रकारे सांगते यावर त्या बाळाची प्रतिक्रिया अवलंबून असते. त्यामुळे त्याच्या वयास योग्य अशा वेळेस दत्तक पालकांनी त्याला ही गोष्ट सांगणे महत्त्वाचे आहे. हे सत्य त्याला सांगणे ही केवळ एक पायरी नसून ती एक सतत चालणारी प्रक्रिया आहे व दत्तक हा विषय त्याच्या आयुष्यात अनेक वेळा, अनेक टप्प्यावर आणि अनेक प्रसंगी येणार आहे. पण शाळेत माझे बाळ दत्तक बाळ आहे हे सांगण्याचे कायदेशीर बंधन नाही.





Ch-099.indd 9 12-11-2021 10:40:29